आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५वाजता

९ ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज संस्थगित/ लोकसभेत ११५ तास तर राज्यसभेत ९० तास विधायक कामकाज

- वक्फ सुधारणा विधेयकाच्या परीक्षणासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना

- देशाचा परकीय चलन साठा विक्रमी पातळीवर

- हर घर तिरंगा अभियानाला देशभरात प्रारंभ/ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त स्वातंत्र्य सैनिकांना देशाची आदरांजली

**आणि**

- नीट पीजी परीक्षा लांबणीवर टाकायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज आज निर्धारित वेळेआधी दोन दिवस संस्थगित करण्यात आलं. गेल्या महिन्यात २२ तारखेला सुरु झालेलं संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपर्यंत चालणार होतं.

लोकसभेत या अधिवेशन काळात १५ बैठका झाल्या, ११५ तास कामकाज झालं, अशी माहिती सभापती ओम बिर्ला यांनी दिली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २३ जुलैला सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर २७ तास १९ मिनिटं चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. या अधिवेशन काळात लोकसभेत नवीन १२ विधेयकं मांडण्यात आली, त्यापैकी वित्त विधेयक, विनियोजन विधेयक, जम्मू काश्मीर विनियोजन विधेयक आणि भारतीय वायुयान विधेयक ही ४ विधेयकं मंजूर झाली, अशी माहिती त्यांनी दिली.

राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर सुमारे २२ तास चर्चा झाली, असं सभापती जगदीप धनखड यांनी सांगितलं. या अधिवेशनात राज्यसभेत सुमारे ९० तास कामकाज झालं, असंही त्यांनी सांगितलं. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन महाराष्ट्रातल्या जनतेची मागणी पूर्ण करावी, अशी मागणी मुंबई वायव्य मतदारसंघाचे खासदार रविंद्र वायकर यांनी केली असून आज ती लोकसभेत पटलावर ठेवण्यात आली.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकाच्या परीक्षणासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना करण्याचा प्रस्ताव आज लोकसभेत मंजूर झाला. या समितीत लोकसभेतले २१ तर राज्यसभेतले १० खासदार आहेत. लोकसभेतले पाल, निशिकांत दुबे, तेजस्वी सूर्य, दिलीप साईकिया, गौरव गोगोई, नरेश म्हस्के, सुरेश म्हात्रे, अरविंद सावंत, इम्रान मसूद, मोहम्मद जावेद, असदउद्दीन ओवैसी, कल्याण बॅनर्जी या सदस्यांचा समावेश आहे. ही समिती संसदेच्या पुढच्या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात शेवटच्या दिवशी अहवाल सादर करील असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ठराव मांडताना सांगितलं.

**<><><><><>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं सर्वात हलकं फ्रंट हार्ड आर्मर पॅनल असलेलं बुलेटप्रुफ जॅकेट विकसित केलं आहे, अशी माहिती संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली. हे स्तर ६ चं सर्वात हलकं जॅकेट असून मध्यम आकाराच्या जॅकेटचं वजन सुमारे १० किलो असून मोहिमेदरम्यान वापरण्यासाठी सुलभ आणि आरामदायक ठरणार आहे. या जॅकेटमध्ये अन्य वैशिष्ट्यांसह क्विक रिलीज प्रणालीचाही समावेश केला आहे, असं सेठ यांनी सांगितलं.

<><><><>

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन यशस्वी ठरल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. संसदेचं अधिवेशन आज संस्थगित झाल्यावर ते नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलत होते. या अधिवेशनात लोकसभेत आणि राज्यसभेत प्रत्येक दिवशी काम झाल्याचं त्यांनी सांगितलं. या सत्रात संसदेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेसोबतच अनेक विधेयकं मंजूर झाल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

देशाच्या परकीय चलन साठ्यात जुलै २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात ४ अब्ज डॉलरपेक्षा जास्त वाढ नोंदवली गेली आहे. देशाच्या परकीय चलन भांडारात सध्या ६७० अब्ज डॉलरपेक्षा जास्त रक्कम जमा झाली आहे. परकीय चलन साठ्याचा हा आतापर्यंतचा सर्वात विक्रमी स्तर असल्याचं रिझर्व्ह बँकेच्या अहवालात म्हटलं आहे. दरम्यान, मागच्या आठवड्यात देशाच्या सोन्याच्या साठ्यातही वाढ झाली असून यात १ अब्ज डॉलरपेक्षा जास्त वाढ झाली आहे.

<><><><>

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या विशिष्ट नोंदणीकृत गुंतवणूकदारांच्या संख्येनं पहिल्यांदाच १० कोटींचा टप्पा पार केला आहे. मार्च २०२१ मध्ये नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या ४ कोटीवर पोहोचली होती. हा आकडा गाठण्यासाठी २५ वर्षांचा काळ लागला होता. मात्र, त्यानंतर सुमारे  ६ ते ७ महिन्यात पुढचे १ कोटी नोंदणीकृत गुंतवणूकदार जोडले गेले होते. तर, केवळ ५ महिन्यात गुंतवणूकदारांची संख्या ९ कोटीवरून १० कोटीवर पोहोचल्याचं, एन एस ई नं एका प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. डिजिटायझेशन, आर्थिक समावेशन आणि गुंतवणूकदारांची जागरूकता यामुळे ही संख्या झपाट्यानं वाढत आहे, असंही या पत्रकात म्हटलं

आहे. या १० कोटी गुंतवणूकदारापैकी बहुसंख्य गुंतवणूकदार महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातले आहेत.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक बाजार बंद होतांना ८२० अंकांनी वधारून ७९ हजार ७०६ अंकांवर पोहोचला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही २५० अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ३६७ अंकांवर पोहोचला.

<><><><><>

“साखर परिषद आणि राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार २०२२-२३” या समारंभाचं आयोजन उद्या नवी दिल्लीत करण्यात आलं असून केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघटनेद्वारे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सहकाराच्या आठ क्षेत्रांमधले राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार देखील यावेळी देण्यात येणार  आहेत.

<><><><><>

९ ऑगस्ट या क्रांती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्या सैनिकांना आदरांजली वाहिली असून आजपासून हर घर तिरंगा अभियानात सहभागी होण्याचं आवाहन देशवासियांना केलं आहे. आज ९ ऑगस्ट  म्हणजे क्रांती दिनापासून  ते १५ ऑगस्ट अर्थात स्वातंत्र्य दिनापर्यंत देशभरात हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान राबवण्यात येणार आहे.

या काळात नागरिकांनी आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा आणि त्याबरोबर सेल्फी घेऊन तो फोटो हर घर तिरंगा या संकेतस्थळावर अपलोड करावा, असं आवाहन केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी केलं आहे.

२०२२ साली स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या अभियानाची सुरुवात झाली. मागच्या वर्षी १० कोटींपेक्षा जास्त नागरिकांनी तिरंग्या बरोबरचा आपला फोटो संकेतस्थळावर पाठवला होता. यावर्षी या अभियाना दरम्यान देशभरात सुमारे दोनशे सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून, येत्या १३ ऑगस्ट रोजी दिल्लीत खासदार आणि केंद्रीय मंत्र्यांचा सहभाग असलेली तिरंगा बाईक रॅली काढण्यात येणार आहे, असही शेखावत यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हस्ते आज मुंबईत ऑगस्ट क्रांती मैदानावर घरोघरी तिरंगा अभियानाचा प्रारंभ झाला. लाखो स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळालं. त्यांच्या त्यागाची आणि बलिदानाची जाणीव तरुणांना व्हावी आणि त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना रूजावी, यासाठी 'घरोघरी तिरंगा अभियान' प्रेरणादायी ठरेल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या अभियानात मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारत छोडो आंदोलनात भाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली. राज्यात सर्वत्र तिरंगा यात्रा काढून क्रांतिदिनानिमित्त शहीदांना आदरांजली वाहण्यात आली, तसंच हर घर तिरंगा अभियानात सहभाग नोंदवण्यात आला.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाजमाध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेत्री प्रिया बेर्डे म्हणाल्या…

**बाईट - प्रिया बेर्डे**

<><><><><>

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची नीट पीजी परीक्षा लांबणीवर टाकण्याची मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. ही परीक्षा येत्या रविवारी ११ ऑगस्ट रोजी होणार आहे. या परीक्षेकरता अनेक उमेदवारांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून दूरवरची किंवा अतिशय गैरसोयीची केंद्र मिळाली असल्याचं याचिकेत म्हटलं होतं. परंतु, या कारणासाठी सुमारे दोन लाख परीक्षार्थींचं भविष्य पणाला लावता येणार नाही, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठानं स्पष्ट केलं.

<><><><><>

देशातली डिजिटल पेमेंटची संख्या २०२३-२४ या वर्षात २ हजार ४२८ लाख कोटी वर गेल्याचं रिझर्व बँकेच्या एका अहवालात म्हटलं आहे.  गेल्या सात वर्षांमध्ये डिजिटल पेमेंटच्या व्याप्तीत प्रतिवर्ष ५० टक्के तर रकमेमध्ये प्रतिवर्षी दहा टक्के वाढ दिसून येत असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

//<><><><><>//